# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
### राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.

---

**लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक**
**दिनांक १०.०६.२०२०**
**<u>इतिवृत्त क्रमांक -११</u>**

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्तीकरीता रिक्त असलेली पदे भरणे करिता दिनांक ०५.०६.२०२० व दि.०८.०६.२०२० रोजी ची तहकुब झालेली कर्मचारी निवड समितीची बैठक दि. १०.०६.२०२० रोजी दुपारी ३.३० वाजता अतिरिक्त आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त (प्रशासन) :- सदस्य
३) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
४) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सचिव
५) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे वरील सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.

18/6/2020

(१२८)

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६ नुसार अनुसूचित जाती संवर्गातील खालील वारसांनी महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११/प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११ अन्वये अन्वये कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने ते सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेस पात्र असलेबाबत समितीने शिफारस केली.

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १. | के.सुनिता राजेंद्र बिगानिया<br>मयत सफाई कामगार | श्री.अक्षय राजेंद्र बिगानिया<br>(मुलगा) | दि.२०.०५.२०२० रोजीच्या कर्मचारी निवड समितीच्या बैठकीत श्री.अक्षय राजेंद्र बिगानिया यांचेवर गुन्हा दाखल आहे किंवा दाखल होता याबाबत भद्रकाली पोलीस स्टेशनचे स्पष्ट अभिप्राय घेणेबाबत निर्देश देणेत आले होते, त्यानुसार भद्रकाली पोलीस स्टेशन यांचे कडील दि.२१.०५.२०२० रोजीच्या प्राप्त झालेल्या पत्रात श्री.अक्षय राजेंद्र बिगानिया यांचेविरुध्द असलेल्या गुरनं ०२/२०१६ भादंवि कलम३०७, ३३७,३२३,५०४,३४ व १४३,१४७, १४८, १४९,३२३,३२४, ४५२, ३३६,५०४, ४२७, भादंवी कलम १३५ – मुंबई पोलिस ॲक्ट नुसार **गून्हा दाखल होता** सदर गुन्हयात मा.सेशन कोर्टाने आरोपी यांना निर्दोश मुक्तता करण्यात आले आहे.भद्रकाली पोलिस स्टेशनतर्फे अथवा अन्य व्यक्तींकडुन मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करण्यात आलेले नाही. असे पत्रात नमुद केले आहे.<br>कर्मचारी निवड समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो-२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार **श्री.अक्षय राजेंद्र बिगानिया हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २. | श्रीम.इंदुबाई अर्जुन जाधव<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | श्री.सचिन अर्जुन जाधव<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो-२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार **श्री.सचिन अर्जुन जाधव,हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ३. | श्री.बाळु कचरु पगारे<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | श्री.कुणाल बाळु पगारे<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो-२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार **श्री.कुणाल बाळु पगारे,हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ४. | श्रीम.किरणबाई विकास छजलाने<br>स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार | श्री.रोहित विकास छजलाने<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो-२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार **श्री.रोहित विकास छजलाने,हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

18/6/2020



Scanned with CamScanner

(९२८)

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ५. | श्री.सुरेश चिमण गांगुर्डे सेवानिवृत्त सफाई कामगार | श्री.महेश सुरेश गांगुर्डे (मुलगा) | श्री.महेश सुरेश गांगुर्डे, यांचा चारित्र पुर्व चारित्र बाबत पोलीस स्टेशनकडील चारित्र पडताळणी अहवाल सादर केले बाबत निदर्शनास येत नाही.तथापि, महानगरपालिकांमध्ये सेवाभरती करतांना पोलिसांनकडुन चारीत्र पडताळणी करून उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत महाराष्ट्र शासन, क्र.संकीर्ण २००७/पडताळणी /नवी -२६ नगरविकास विभाग नागपुर दि.२१.११.२००७ या शासन निर्णयान्वये **श्री.महेश सुरेश गांगुर्डे, यांचा चारित्र पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्रकरण कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेत यावे असे समितीने निर्देश दिले.** |
| ६. | कै.हिरामण दामु लोंढे मयत स.कामगार | श्री.पंकज हिरामण लोंढे (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो-२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार **श्री.पंकज हिरामण लोंढे,हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे..** |
| ७. | श्रीम.पारु वसंत साळवे स्वेच्छानिवृत्ती स.का | श्री.दिपक वसंत साळवे (मुलगा) | श्री.दिपक वसंत साळवे, यांचे चारित्र्य पडताळणी बाबत त्यांचेविरुध्द ना.रोड पोलीस स्टेशन येथे दाखल असलेला गुन्हा र.नं.६३०/२०१६ भादंवि ४९८, ३२३,५०४,३४ व मुख्य न्यायदंडाधिकारी,कौटुंबीक न्यायालय, नाशिक यांचेकडील केस क्र.७५९३/२०१६ दि.१५.१०.२०१६ अत्याचारी हिंसापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये १२ अन्वये निकाली काढण्यात आली असल्याचे मा.पोलीस आयुक्त,नाशिक यांचेकडील अहवालात नमुद केले आहे. तसेच, सदर केसच्या निकालपत्रात एकमेकांच्या संमतीने घटस्फोट घेणेबाबत मान्य झाल्याने हिंदु विवाह कायदयानुसार केस निकाली काढणेत आली असल्याचे निकालपत्रात नमुद असल्याने श्री.दिपक वसंत साळवे यांचा घटस्फोट झाल्याचे सिध्द होत आहे.<br>**श्री.दिपक वसंत साळवे यांनी सादर केलेल्या लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असलेबाबत नमुद आहे. तसेच, श्री.दिपक वसंत साळवे यांची बहीण पल्लवी वसंत साळवे यांचे संमतीपत्र सादर केले असल्याचे निदर्शनास येत नाही. याबाबत श्री.साळवे यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्रकरण कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेत यावे असे समितीने निर्देश दिले.** |
| ८. | कै.सुरेश मोगल पगारे मयत स.कामगार | श्री. हेमंत सुरेश पगारे (मुलगा) | कै.सुरेश मोगल पगारे यांचे दोन प्रपंच असल्याचे निदर्शनास येत असुन कै.सुरेश मोगल पगारे यांचे रिक्तपदी (१) हेमंत सुरेश पगारे (मुलगा) (२) तुषार सुरेश पगारे (मुलगा) यांनी नियुक्ती बाबत अर्ज दाखल केले असता हेमंत सुरेश पगारे यांनी मा.न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर केले आहे. सदरचे वारस प्रमाणपत्र हे एकतर्फी देण्यात आले असल्याचे निदर्शनास येत आहे.<br>कै.सुरेश मोगल पगारे यांचे दोन्ही मुलांना वारस प्रमाणपत्र सादर करणेबाबत विभागामार्फत पत्र देणेत आले होते असे ना.पुर्व विभागाने नमुद केले आहे परंतु सादर केलेले पत्राची प्रत संचिकेस आढळुन आलेले नाही. **याबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाने खात्री करून कै.सुरेश मोगल पगारे यांची दुसरी पत्नी व मुलगा श्री.तुषार सुरेश पगारे यांचे कडुन वारस असलेबाबतचे वैध न्यायालयीन दस्त सादर करणेकामी पत्राद्वारे मागणी करणेत यावी .सदर कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर व खात्री झालेनंतर सदरचे प्रकरण कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेत यावे असे समितीने निर्देश दिले.** |

18/6/2020



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ९. | कै.सुहास किसन पुंड, मयत सफाई कामगार | कु.साहिल सुहास पुंड (मुलगा) | कु.साहील सुहास पुंड, यांचे वय हे १८ वर्षापेक्षा कमी असुन शासकिय नियुक्तीकरीता नियमान्वये १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. तसेच, कु.साहील सुहास पुंड, हे **इतर मागासवर्ग** हया संवर्गातील असल्याने, मा.शासन निर्णय क्र. : सफाई – २०१५ प्र.क्र. २५८/ महामंडळे, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, दिनांक ११ मार्च २०१६ यातील तरतुदींस अनुसरुन नसल्याने **ते नियुक्तीस अपात्र होत असल्याची निवड समिती शिफारस करत आहे.** |

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेणेत आला की, वरील प्रमाणे कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत चर्चा करणेत आली व दिलेल्या निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत येऊन पुढील बैठकीत माहिती सादर करावी असे निर्देश समितीने दिले. तसेच, कर्मचारी निवड समितीची पुढील बैठकीचे नियोजन करणेत यावे असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

18/6/2020

(डॉ.कल्पना कुटे)
संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(अर्चना साबे)
कामगार कल्याण अधिकारी, व उपआयुक्त (समाजकल्याण),
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(मनोज घोडे पाटील)
उपआयुक्त (प्र.)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

(बी. जी. सोनकांबळे)
अतिरिक्त आयुक्त,सेवा व मुख्य लेखापरिक्षक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक



Scanned with CamScanner